माहे नोव्हेंबर-२०२० ते डिसेंबर-२०२० या कालावधीत मुदत संपणाऱ्या ३ नगरपरिषदा व ६५ नगरपंचायतींमधील सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम २०२०

सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.६/का.६
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २३ डिसेंबर, २०२०.

संदर्भ :-१) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम २०२०, दि. १२ मार्च, २०२०.

२) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.१/का.६, दि. ६ फेब्रुवारी, २०२०

३) राज्य निवडणूक आयोगाचे नगरपरिषद / नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम दि.१२/१०/२०२०

४) नगरपरिषद, नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा अंशत: सुधारित कार्यक्रम, २०२० दि. १३ नोव्हेंबर, २०२०

५) प्रादेशिक उपसंचालक नगरपरिषद प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांचे दि. १५/१२/२०२० चे पत्र.

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए मधील तरतुदीनुसार नगरपरिषदा, नगरपंचायतीच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात घेण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

२. आणि ज्याअर्थी, भारतीय संविधान व महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील तरतुदीनुसार नगरपरिषदा / नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका घेणे आवश्यक आहे.

३. आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाचे नगरपरिषदा, नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम २०२० नुसार जाफ्राबाद नगरपंचायत, जि. जालनाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभाग रचनेच्या अनुषंगाने आरक्षण व सोडत काढतेवेळी

सोडतीच्या चिठ्ठ्या पारदर्शक ड्रममध्ये न टाकता सोडतीच्या चिठ्ठ्या पुठ्ठ्याच्या खोक्यामध्ये टाकून सोडतीची कार्यवाही पूर्ण करण्यात आली. त्यामुळे आरक्षणाच्या सोडतीची प्रक्रिया पारदर्शकरित्या पार पडलेली नाही.

४. आणि ज्याअर्थी, सोडतीची प्रक्रिया चुकीची झाल्यामुळे निवडणूक प्रक्रिया मुक्त व पारदर्शकरित्या पार पाडणे आवश्यक असल्यामुळे अनुसूचित जातीच्या प्रवर्गाची सोडत वगळून नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण (महिला) याबाबतची संपूर्ण सोडत नव्याने घेणे आवश्यक आहे.

५. आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोग सांविधानिक जबाबदारी पार पाडत असताना अशी चूक निदर्शनास आली तिचा या निवडणुकीवर तसेच भविष्यातील निवडणुकीवर परिणाम होणार असल्याने सदर चुकीकडे दुर्लक्ष न करता सदर चुकीची तात्काळ दुरुस्ती करणे योग्य व न्यायिक आहे अशी आयोगाची खात्री झाली आहे.

६. आणि त्याअर्थी, संविधानातील २४३ झेडए व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १० व १० अ (४) मधील प्राप्त अधिकाराचा वापर करुन, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र यांनी खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत:-

## आदेश

i) राज्य निवडणूक आयोगाने जाफ्राबाद नगरपंचायत जिल्हा जालना या स्थानिक स्वराज्य संस्थेचा सन २०२० सार्वत्रिक निवडणुकीचा दि. १२/१०/२०२० रोजी निर्गमित केलेला प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम २०२० मधील परिशिष्ट-१ मधील टप्पा क्रमांक अ (४) मध्ये सोडतीच्या प्रक्रियेमध्ये झालेल्या चुकीमुळे; सदर टप्पा क्र. अ (४) मधील अनुसूचित जातीच्या प्रवर्गाची सोडत वगळून नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण (महिला) याबाबतची संपूर्ण आरक्षणाच्या सोडतीची कार्यवाही व आयोगाच्या दि.१३/११/२०२० परिशिष्ट-१ मधील कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

ii) जाफ्राबाद नगरपंचायत जि. जालनाच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता प्रभाग रचनेच्या अनुषंगाने आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-१** नुसार जाहिर करण्यात येत आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:-

१) प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
३) विभागीय आयुक्त, औरंगाबाद व जिल्हाधिकारी, जालना.
४) मुख्याधिकारी, जाफ्राबाद नगरपंचायत.
५) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी व कार्यासने.
६) राज्य निवडणूक आयोगाचे मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये नेमलेले वकील.
७) **निवड नस्ती, का. ६.**

# परिशिष्ट-१

## जाफ्राबाद नगर पंचायत सार्वत्रिक निवडणूक-२०२०-२१

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.६/का.६ दि. २३/१२/२०२० सोबतचे सहपत्र)

## सोडत, प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्दी, हरकती व सूचना तसेच सुनावणी व अंतिम प्रभाग रचना प्रसिध्दी इत्यादिचा सुधारित कार्यक्रम

| अ. क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे. | टप्पा सुरु करण्याचा / संपविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | **अ) प्रारुप प्रभाग रचना आरक्षणासह** | | |
| १. | सदस्य पदांच्या आरक्षणाच्या सोडतीकरिता नोटीस प्रसिध्द करणे **(जिल्हाधिकारी व नगर पंचायत वेबसाईटसह)** | जिल्हाधिकारी | २८/१२/२०२० (सोमवार) |
| २. | नगरपंचायतीच्या सदस्य पदांच्या आरक्षणाची सोडत काढणे. नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व त्यामधील महिला तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील महिला) | मुख्याधिकारी | ३०/१२/२०२० (बुधवार) |
| | **ब) हरकती व सूचना मागविणे तसेच सुनावणी देणे** | | |
| १. | प्रारुप प्रभाग रचना, प्रभागदर्शक नकाशे व सदस्य पदांच्या आरक्षणाची अधिसूचना (कलम १० नुसार) रहिवाश्यांच्या माहितीसाठी हरकती व सूचना मागविणेकरिता वेबसाईवर उपलब्ध असल्याबाबत स्थानिक वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपंचायतीच्या वेबसाईटवर नोटीस प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | ०४/०१/२०२१ (सोमवार) पर्यंत |
| २. | हरकती व सूचना मागविण्याचा कालावधी | | ०४/०१/२०२१ (सोमवार) ते ११/०१/२०२१ (सोमवार) पर्यंत |
| ३. | प्राप्त हरकती व सूचनांवर सुनावणी देणे. | जिल्हाधिकारी | १३/०१/२०२१ (बुधवार) पर्यंत |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | हरकती व सूचनांच्या अनुषंगाने अभिप्राय देऊन **औरंगाबाद विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन**, यांचेकडे अहवाल पाठविणे | जिल्हाधिकारी | १५/०१/२०२०१ (शुक्रवार) पर्यंत |
| ५. | अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे. | **विभागीय आयुक्त, औरंगाबाद** | १९/०१/२०२१ (मंगळवार) पर्यंत |
| **क) अंतिम प्रभाग रचना (प्रभाग निहाय एकूण लोकसंख्या, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या तसेच आरक्षणासह)** | | | |
| १. | अधिनियमातील कलम १० नुसार अंतिम अधिसूचना प्रसिध्द करुन त्याची सूचना वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपंचायतीच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे. | जिल्हाधिकारी | २१/०१/२०२१ (गुरुवार) पर्यंत |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र